**किरण कुलकर्णी**
**उप विभागीय अधिकारी,**
**जळगांव (जामोद)**
**जिल्हा – बुलडाणा.**

**रेकॉर्डींग** : **दिनांक ५/७/१९९७**

**ब्रॉडकास्टिंग** : **दिनांक १४/७/१९९७**

- - - - - - - - - - - - -

## पूरपरिस्थितीत घ्यावयाची काळजी

'पूर' हा शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यापुढे अफाट पसरलेले पाणी, घराघरातून झालेली वाताहत आणि वित्तहानीचे चित्र येते. जीवनदायिनी ठरणारी नदीमाता पूराच्या वेळेस अक्राळविक्राळ रुप धारण करते. ते रुप पाहून भीती वाटते. इतर वेळेस संथपणे वाहणारी, नयनरम्य आणि आश्वासक भासणारी नदी ती हीच का, असा प्रश्न पडतो. पावसाळ्यामध्ये नदीकाठची, मोठ्या नाल्याकाठची घरे पूराच्या भीतीच्या छायेखालीच असतात.

पावसाळ्याच्या सुरुवातीचा काळ हा शेतकऱ्यांचा पेरणीचा काळ, पहिल्या एक-दोन पावसात उन्हाळ्यात तापलेली धरती थंड होऊ लागते आणि मग जसा जसा पाऊस वाढू लागतो. तशी पूराची शक्यता वाढू लागते. एखाद्या दिवशी अचानकपणे काळे ढग आकाशात चाल करुन येतात. पीक चांगलं यावं, म्हणून शेतकरी ज्याची प्रार्थना करत असतात, तो वरुण राजा उग्र रुप धारण करतो आणि मुसळधार पाऊस सुरु होतो. थोड्याच वेळात नदीनाले दुथडी भरुन वाहू लागतात आणि अतिवृष्टीचा तडाखा बसतो. शासकीय परिभाषेमध्ये एका दिवशी ६५ कि.मी. च्या वर पाऊस झाला, की अतिवृष्टी झाली असे म्हणतात. अशा प्रकारच्या संभाव्य भागात किंवा जिल्ह्यात अतिवृष्टी होणार असा हवामान खात्याचा अंदाज आधीच शासकीय यंत्रणेला कळविण्यात आलेला असतो. त्या दृष्टीने शासकीय यंत्रणा आणि जनता या दोन्ही घटकांनी अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी सुसज्ज राहायला हवे. म्हणूनच जसा जसा पावसाळा जवळ येतो, तसा पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास त्याला तोंड देण्यासाठीचा आराखडा तयार करुन नदीनाल्याकाठच्या गावचे गावकरी आणि शासकीय यंत्रणेला तयारीत ठेवले जाते.

पूरपरिस्थितीमध्ये पीकांचे नुकसान, वित्तहानी, प्राणहानी ह्यापासून लोकांना जास्तीत जास्त कसे सरंक्षण देता येईल ह्याबाबत शासन दक्ष असते. दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातल्या सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची जिल्हा पूर नियंत्रण समिती पावसाळ्याच्या तोंडावर स्थापन करण्यात येते. जिल्हा पातळीवरील समिती प्रमाणेच तालुका पातळीवर पूर नियंत्रण समिती स्थापन केली जाते. महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असतात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार, संवर्ग विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी व तालुका पातळीवरील अभियंते त्या समितीचे सदस्य असतात.

अशाच प्रकारे नदीनाल्याकाठच्या गावांमध्ये देखील पूर नियंत्रण समिती स्थापण्यात येते. गांव पातळीवरील पूर नियंत्रण समितीचे गावचे सरपंच हे अध्यक्ष असून तलाठी, पोलीस पाटील, प्राथमिक स्वास्थ्य कर्मचारी, पशुधन पर्यवेक्षक, पशु संवर्धन विभाग, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, पुरवठा निरिक्षक, शाळेचे मुख्याध्यापक, स्वस्त धान्य दुकानदार हे या गावपातळीवरील समितीचे सदस्य असतात.

ज्या गावांना पुरापासून धोका होण्याची शक्यता असते अशा गावांमध्ये वेळोवेळी वेधशाळेकडून प्राप्त होणाऱ्या बिनतारी संदेशानुसार संभाव्य धोक्याची कल्पना यावी, म्हणून दवंडी देण्यात येते. संभाव्य पूरापासून धोका पोहोचण्याची शक्यता असलेल्या धरणे व प्रकल्पांच्या दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी करुन घेण्याबाबत सिंचन विभागाच्या अभियंत्यांना सूचित करण्यांत येते.

पूराला तोंड देण्यासाठी गावकऱ्यांनी काय काम करायला हवं? काही गोष्टी सुचविता येतील. उदाहरणार्थ –

पूराची सूचना मिळाल्यावर सुध्दा नदी नाल्याकाठचे लोक, घर रिकामे करण्यास तयार होत नाहीत, असा अनुभव आहे. अशा नागरिकांनी अतिवृष्टी किंवा पूराच्या धोक्याबाबत सूचना मिळाल्यानंतर तात्काळ सुरक्षित स्थळी जाणे आवश्यक आहे.

पूराचे पाणी पुलावरुन वाहत असताना पूल पार करण्याचे धाडस स्वतः करु नये व इतरांनाही तसे करण्यापासून परावृत्त करावे.

गावातील संपर्क माध्यमांचा वापर करुन अथवा कोणाच्यातरीमार्फत तहसिल कार्यालयातील पूर नियंत्रण कक्षात तात्काळ माहिती द्यावी, म्हणजे शासकीय यंत्रणा त्वरीत मदत पोहोचवू शकेल.

पूरामुळे चोहोबाजूंनी संपर्क खंडीत होणाऱ्या गावांबाबत :-

होडी तयार ठेवणे.
रबर ट्यूब तयार ठेवणे.
भरपूर लांबीचा दोरखंड उपलब्ध ठेवणे.
पोहणाऱ्या तरुणांची यादी.

अशा बाबी हाताशी तयार असल्यास परिस्थितीला तोंड देणे सोपे होऊ शकते.

वादळी पाऊस, गारा, वीज पडणे यापासून संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने शेतात काम करणाऱ्या मजूरांनी, जास्त पावसाची चिन्हे दिसताच झाडांचा आसरा न घेता सुरक्षित ठिकाणी थांबावे. अन्यथा वादळ-वाऱ्याने अथवा वीज कोसळल्याने झाडे उन्मळून पडून प्राणहानी होऊ शकते.

पूर येवून गेल्यानंतर घ्यावयाच्या काळजीबाबत काही मुद्दे सांगायला हवेत –

पूर येवून गेल्यानंतर विहिरीतले, तळ्यातले, नदीतले पाणी प्रदूषित होण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी ग्रामपंचायतीतर्फे पुरविण्यात येणाऱ्या ब्लिचिंग पावडरचा उपयोग करुन पाणी शुध्द करावे. आरोग्य केंद्रातून मिळणाऱ्या 'मेडिक्लोर' या औषधाचे दोन थेंब पिण्याच्या पाण्यात रोजच्या रोज टाकले, तरी पुरे! साथीचे रोग पसरु नयेत म्हणून लसीकरण, साफसफाई इत्यादी उपाययोजना कराव्यात. पूर ओसरल्यानंतर जनावरांमध्येही रोगराई पसरण्याची शक्यता असते. त्या दृष्टीने वेळीच प्रतिबंधक उपाय योजावे लागतील. बैलांना लस टोचून घेणे महत्वाचे. प्रत्येक तहसिलमध्ये पर्जन्यमापनाची नोंद असते व जून ते ऑक्टोबर पावेतो दररोज पर्जन्यदर्शक अहवाल बिनतारी संदेशाद्वारे वेधशाळेला कळविला जातो. जून ते ऑक्टोबर या काळात जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रत्येक तहसिल कार्यालयात पूर नियंत्रण कक्ष उघडण्यात येत असतो व त्याचे दूरध्वनी क्रमांक सर्व संबंधित कार्यालयांना कळविण्यात येतात. पावसाळ्यात तलाव व बंधारे ह्यांच्या परिस्थितीबद्दल व पाण्याच्या पातळीबद्दल नेहमी माहिती देण्यात येते. ज्या गावाला चोहोबाजूनी पूरामुळे वेढले जाते अशा अतिसंवेदनशील गावांबद्दल तालुका पातळीवर विशेष लक्ष देण्यात येऊन त्या गावात औषधे, केरोसिन आणि अन्नधान्याचा साठा करण्यात येतो.

पूर परिस्थितीला तोंड देताना कमीत कमी वेळात वैद्यकीय मदतीसारख्या सोई त्वरीत जागेवरच कशा उपलब्ध होतील ह्याकडे लक्ष दिले जाते. सर्व प्रकारच्या उपाययोजना करुनही पूर परिस्थती आटोक्याबाहेर गेली आणि काही प्राणहानी वा वित्तहानी झाल्यास २४ तासांच्या आत बिनतारी संदेशाद्वारे शासनास कळविण्यात येते. नैसर्गिक आपत्तीतील आपादग्रस्तांना शासनातर्फे आर्थिक मदत देण्यात येते. ही मदत श्रमजीवी कुटूंब कल्याण योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, निराधार अनुदान आणि इतर योजनांखाली दिली जाते.

| | |
|---|---|
| १) मृत्यू झाल्यास श्रमजीवी कुटूंब कल्याण योजने अंतर्गत | रु. ३,०००/- |
| २) कायमचे अपंगत्व आल्यास | रु. ३,०००/- |

३) एक अवयव वा एक डाळा निकामी झाल्यास — रु. १,०००/-

४) ह्याशिवाय मुख्यमंत्री सहाय्यता निधीतूनही आर्थिक मदत मिळते, ती अशी –

(अ) पूरामुळे मृत्यू आल्यास — रु. २५,०००/-

(आ) वीज पडून मृत्यू आल्यास — रु. ५,०००/-

५) <u>सानुग्रह अनुदान –</u>

अ) पूरामुळे निराधार झालेल्या व्यक्तिंना रु.४५०/- प्रमाणे मदत देण्यात येते.

ब) घर किंवा गुरांचे गोठे ह्यांच्या दुरुस्तीकरिता मदत रु.२,०००/- अनुदान व रु. ८,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येते.

क) घर किंवा गुरांच्या गोठ्याच्या पुर्नबांधणीसाठी मदत रु. ४,०००/- पर्यंत अनुदान व रु. १०,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येते.

६) <u>मृत जनावरे व शेळ्यामेंढ्यांकरिता मदत –</u>

मृत पावलेल्या जनावरांकरिता, २ मृत जनावरांच्या मर्यादेपर्यंत प्रत्येक जनावरासाठी रु.३,०००/- मदत दिली जाते. ह्यामध्ये २५% अनुदान व ७५% कर्ज देण्यात येते.

शेळ्या मेंढ्यांकरिता रु.३५०/- प्रमाणे जास्तीत जास्त १० शेळ्या मेंढ्यांकरिता मदत दिली जाते. ह्यामध्ये २५% अनुदान व ७५% कर्जाचा समावेश आहे.

ह्याशिवाय केंद्रशासनाच्या कुटूंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत जर कुटूंब प्रमुख पूरामुळे मृत झाला असेल, व तो १८ ते ६४ वर्षे वयोगटातील असेल आणि जर तो दारिद्य रेषेखालील असेल तर त्याला रु.१०,०००/- अनुदान देण्यात येते.

नद्यांच्या अथवा नाल्यांच्या काठावरील पीकांचे पूरामुळे हमखास नुकसान होते. अशा नुकसानीबाबत गाववार व पीकवार माहिती महसूल व कृषी खात्यामार्फत संयुक्तरित्या पाहणी करुन गोळा केली जाते. ही माहिती जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करण्यात येते. त्याबाबत मदत जाहीर करण्याची बाब शासनाच्या अखत्यारीत आहे.

पूरपरिस्थिती हाताळताना लोकांचे सहकार्य ही बाब सर्वात महत्वाची ठरते. पूराची दवंडी ऐकताच गावातील महत्वाच्या माणसांनी एकत्र येवून पूराला तोंड देण्याची तयारी करायला पाहिजे. गावातील कोणत्या ठिकाणी पूराचे पाणी शिरु शकते. गावातल्या उंच जागा कोणत्या, पाण्यापासून बचाव करण्यासाठी पूरग्रस्त कुटूंबाना कुठे नेवून ठेवता येईल हा विचार आधी करता

येईल. गावातली चांगल्या पोहणाऱ्या तरुणांची यादी हाताशी असली तर बचाव कार्य सोपे होईल. पूरग्रस्त कुटूंबाना मदतीसाठी सेवृभावी संस्थांबरोबरच गावकऱ्यांनाही पुढाकार घेता येईल. त्यांच्या खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्याची सोय गावातल्या शाळेत करता येईल. अशा एक ना दोन, अनेक गोष्टी सांगता येतील. 'गांव करी ते राव ना करी' हे अगदी खरे आहे. पूराच्या संकट प्रसंगी गावाने एक व्हायला हवे.

'माझ्या घरात जोपर्यंत पूराचे पाणी शिरले नाही, तोपर्यंत मी कशाला विचार करु?' असे कोणी म्हणू नये. शेजारच्या घरात पुराचे पाणी शिरले, म्हणजे ते आपल्या घरातही येऊ शकते, हे लक्षात ठेवायला हवे. आमच्या गावच्या नदीला गेल्या २५ वर्षात पूर आला नाही, म्हणजे यंदाही येणार नाही, असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. पूरासारखी नैसर्गिक आपत्ती क्वचितच येते, पण येते. तेंव्हा, होत्याचं नव्हतं करुन जाते. तेव्हा तयारीत राहणचं श्रेयस्कर! तयारी वाया गेली, तर आनंदच आहे, पण वेळ आली, तर गावकरी संकटाच्या मुकाबल्यासाठी तयार असले पाहिजेत. म्हणून पूरपरिस्थितीत कोणता प्रसंग ओढवू शकेल, याचा अंदाज आधीच करुन ठेवायला हवा. नियोजन हवे आणि ते प्रत्यक्ष उतरवायची इच्छाशक्ती हवी.

पूरपरिस्थितीला तोंड देताना शेवटचा आणि माझ्या दृष्टीने सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे मनोधैर्य! शासकीय यंत्रणा आणि गावकरी या दोन्ही घटकांनी एकमेकांचे मनोधैर्य टिकवायचा जाणीवपूर्वक प्रयत्न करायला पाहिजे. कारण खरी कसोटी तिथेच असते. या मुद्दयावर कुसूमाग्रजांच्या 'कणा' या कवितेचा उल्लेख करण्याचा मोह मी टाळू शकत नाही. त्यामध्ये पुराच्या संकटाला तोंड देणारा विद्यार्थी आपल्या गुरुकडून आर्थिक मदतीची नव्हे, तर पाठीवर हात ठेवून 'लढ' म्हणण्याची अपेक्षा ठेवतो. आपण देखील पुराच्या प्रसंगाला तोंड देताना असाच एकमेकांच्या पाठीवर हात ठेवून खंबीरपणे उभे राहूयात.